**<u>विशेष दिवाणी दावा क्र.११६/२०१६ मधील नि.क्र.८५ वरील आदेश</u>**
**<u>(निलेश गांधी विरुध्द अरिहंत डेव्हलपर्स वगैरे)</u>**
**<u>CNR No.MHSN020007562016</u>**

१. प्रतिवादी क्र.१.१ ते १.३ व प्रतिवादी क्र.२ यांनी, त्यांच्या विरुध्द 'विना कैफियत' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करुन घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा रक्कम वसुलीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी यापूर्वी नि.क्र.६१ कडे कैफियत दाखल करुन घ्यावी म्हणून अर्ज दाखल केलेला होता. परंतु तो ०२/१२/२०२१ रोजी फेटाळण्यात आला.

३. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे ते पूर्वी केसकामी हजर झालेले होते. परंतु त्यांनी कैफियत दिलेली नव्हती. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश झालेला होता. परंतु प्रतिवादी यांनी अज्ञानामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश झालेला होता असे गृहीत धरुन नि.क्र.६१ प्रमाणे एकतर्फा हुकूम रद्दबातल होवून मिळणेकरीता अर्ज केला होता. त्यामुळे तो तांत्रीक दृष्टया फेटाळण्यात आला. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. सदर अर्जास अनुषंगून वादी यांनी नि.क्र.८७ कडे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे.त्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीविरुध्द विना कैफियत आदेश होवून १९७० दिवसाचा काळ उलटलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे प्रचंड विलंबाने सदरचा विलंब माफीचा अर्ज करुन कैफियत दाखल करुन घेण्यास परवानगी मागत आहेत. ती मुलतः मंजूर होण्यास पात्र नाही. सबब त्यांनी प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

५. सदरहु अर्जाला अनुसरुन वादी प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा रक्कमेच्या वसुलीसाठी केलेला आहे. प्रस्तुत केसकामी वादींचा पुरावा संपलेला आहे. सध्यस्थितीत प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत belated स्टेजला प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल होवून मिळण्याची मागणी केलेली आहे.

६. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांना exparte हुकूम व No W.S. आदेश यामधील फरक माहीती नाही असे कथन केलेले आहे. परंतु प्रतिवादी यांना त्यांनी ॲड. जयंत कुलकर्णी या वकीलांची नियुक्ती केलेली होती ही बाब माहीती असल्याचे दिसून येते. निश्चितच प्रतिवादीनी वकीलाची नियुक्ती केलेली असल्यामुळे दाव्यामध्ये प्रतिवादींविरुध्द कोणते आदेश झालेले आहेत याची प्रतिवादींना माहीती होणे ही स्वाभाविक बाब असते.

७. प्रस्तुतचा दावा हा सुमारे सहा वर्षे इतका जुना आहे. वादींचा साक्षीपुरावा पुर्ण झालेला आहे. परंतु दाव्याचे स्वरुप विचारात घेता जर प्रतिवादी यांना दाव्याला अनुसरुन कैफियत देण्यापासून प्रतिरोधीत केले तर सदरचा दावा हा गुणदोषावर निकाली होवू शकणार नाही. त्यामुळे जरी सदरहु दाव्याचा निकाल आहे त्या पुराव्यावर दिला गेला तरी सदरहु हुकूमाची अमंलबजावणी होण्यास वादी यांना त्रास होवू शकतो. तसेच प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यापासून प्रतिरोधीत केले गेले तर भविष्यात दावे प्रतिदावे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

८. दाखल कागदपत्रांवरुन प्रतिवादी यांनी निर्विवादपणे त्यांच्याविरुध्द झालेला No W. S. आदेश रद्द करुन मिळणेसाठी उशीराने अर्ज दिलेला आहे असे स्पष्ट

दिसून येते. प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले कोणतेही कारण स्वीकारण्या योग्य नाही. परंतु असे असले तरी केवळ आणि केवळ दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दावा हा रक्कम वसुलीचा असल्यामुळे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्यापासून जर प्रतिरोधीत केले व जर भविष्यात मंजूर झाला तर वादी यांना रक्कमेची वसुली होण्यास अडचण निर्माण होईल असे वाटते. त्यामुळे सदरहु दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने प्रतिवादींविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करावा असे वाटते.

९. परंतु सदरहु आदेश रद्द करत असताना प्रतिवादी यांनी जे कैफियत दाखल करण्यास कालहरण केलेले आहे. ती बाब देखील दुर्लक्षीत करता येणार नाही. तसेच दावा हा प्रतिवादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित असताना प्रतिवादी अशा प्रकारचा अर्ज देतात ही प्रतिवादीची कृती देखील judicial note घेण्यासारखी आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास जो उशीर झालेला आहे, त्या विलंबाची माफी १०,०००/– रुपये इतकी कॉस्ट तात्काळ वादी यांना देण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर प्रतिवादींविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करावा असे वाटते. सबब खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.१.१ ते १.३ व प्रतिवादी क्र.२ यांचा नि.८५ कडील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१.१ ते १.३ व प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश त्यांनी वादी यांना १०,०००/– रुपये कॉस्ट तात्काळ देण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर रद्द करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.१.१ ते १.३ व प्रतिवादी क्र.२ यांनी १०,०००/– रुपये इतकी कॉस्ट दिनांक २२/११/२०२२ रोजी वादी यांना अदा केली तरच ते दाखल करत असलेली कैफियत केस कामी स्वीकारण्यात यावी .

४. जर प्रतिवादी यांनी दिनांक २२/११/२०२२ रोजी कॉस्टची रक्कम वादी यांना अदा केली नाही तर सदरहु हुकूम आपोआप संपुष्टात येईल याची प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

५. वादी प्रतिवादी यांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale Digitally signed by Abhay Ashok Mehendale Date: 2022.11.22 14:51:26 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**
**दिनांक–२१.११.२०२२** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

## <u>प्र मा ण प त्र</u>

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **२१.११.२०२२** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **२२.११.२०२२** |